मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार दिनांक ५ मार्च २०२४ । पान १

## वाकड, सांगवी येथे विविध विकासकामांना सुरुवात

### खासदार बारणे यांच्या हस्ते रस्ता आणि ओपन जिमचे भूमिपूजन संपन्न

**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

कस्पटे वस्ती वाकड येथे सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन तसेच ममतानगर सांगवी येथे ओपन जिमचे भूमिपूजन मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते संपन्न झाले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामाला सुरुवात झाल्याने नागरिकांनी खासदार श्रीरंग बारणे यांचे आभार मानले.वाकड मधील कस्पटे वस्ती परिसरातील अनमोल रेसिडेन्सी सोसायटी परिसरात चांगला रस्ता नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. माजी नगरसेवक संदीप कस्पटे यांनी खासदार बारणे यांच्याकडे पाठपुरावा करून या कामाला गती देण्यासाठी प्रयत्न केले. इथल्या रस्त्याची अवस्था खूप बिकट झाली होती. सोसायटीच्या सभासदांना रोज रहदारीसाठी खूप त्रास सहन करावा लागत होता. याची तातडीने दखल घेऊन लगेच या रस्त्याच्या कामासाठी खासदार बारणे यांनी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून काँक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. हे काम लवकरच पूर्ण होऊन सोसायटीच्या सभासदांना उत्तम रस्ता उपलब्ध होणार आहे. याप्रसंगी माजी नगरसेवक संदीप अण्णा कस्पटे, सोसायटीचे चेअरमन मंगेश काकडे, ज्योती पाटील, अनिल दातार आणि सोसायटीचे सर्व सभासद उपस्थित होते. यावेळी बोलताना खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहरात नगरविकास विभाग आणि एकूणच विविध विभागांच्या माध्यमातून मोठा निधी आणणे शक्य झाले आहे. खासदार निधी देखील मोठ्या प्रमाणात शहरातील विविध विकासकामांसाठी वापरण्यात आला आहे. शहरातील पाणीपुरवठा योजना, ड्रेनेजच्या कामासाठी अमृत योजनेंतर्गत तसेच प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत निधी आणला आहे. कस्पटे वस्ती येथे चांगला रस्ता व्हावा ही नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्णत्वास जात आहे.सांगवी मधील ममतानगर परिसरात खासदार निधीतून ओपन जीमचे भूमिपूजन खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते करण्यात आले. या ओपन जिमसाठी ३० लाखांचा निधी उपयोगी येणार आहे. या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी माजी स्थायी समिती अध्यक्ष प्रशांत शितोळे, माजी नगरसेविका सुषमा तनपुरे, स्वरूपा खापेकर, विजय साने, चेतन शिंदे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष कमलाकर जाधव, शितल शितोळे आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.



## पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या इमारतीची पायाभरणी..!

### शहराच्या लौकीकात भर घालणारी भव्य वास्तू उभारणार

**। पिंपरी-चिंचवड।**

पिंपरी-चिंचवड शहरातील पक्षकार आणि वकील बांधवांच्या मागणीनुसार अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले न्यायालय संकुलाचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. मोशी येथे सर्व सोयी-सुविधांयुक्त न्यायालय संकूल साकारात आहे. ही इमारत शहराच्या लौकीकामध्ये भर घालणारी ठरेल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे. पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुलाच्या भव्य इमारतीचे भूमिपूजन बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या शुभहस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्रकुमार उपाध्याय, न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, न्यायमूर्ती संदीप मारणे, न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर आणि पुणे जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवडचे दिवाणी न्यायाधीश राजेश वानखेडे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रामराजे भोसले-पाटील यांच्यासह विधी क्षेत्रातील मान्यवर आणि वकील, विधीतज्ञ यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला.

दि. १ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न सुटला नव्हता. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने ‘व्हीजन-२०२०’ अभियानांतर्गत न्यायालय संकुलासाठी पाठपुरावा करण्यात आला.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, शहरातील न्यायालयाच्या स्थापनेपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सोडवण्यासाठी २०१४ पासून आम्ही प्रामाणिकपणे पाठपुरावा केला. राज्याचे नेते तथा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कॅबिनेट मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे शहराच्या लौकिकात भर घालणाऱ्या या भव्य वस्तूची पायाभरणी होत आहे. ही पिंपरी-चिंचवडच्या नावलौकीकात भर घालणारी वास्तू निर्माण होईल. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पाहिलेले एक स्वप्न पूर्ण होत आहे, याचे समाधान वाटते. आगामी दोन वर्षांत या प्रशस्त व भव्य न्यायसंकुलाचे काम पूर्ण होईल आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्याहस्ते लोकार्पण होईल, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला.

# पाणीपट्टी थकबाकीदारांच्या तोंडचे पाणी पळणार

## महापालिकेने घेतला 'हा' मोठा निर्णय

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहरातील नळजोडधारकांकडे १२८ कोटी ३८ लाख ७४ हजार रुपयांची पाणीपट्टीची थकबाकी आहे. त्यामुळे करसंकलन विभागाने पाणीपट्टी वसुलीकडे मोर्चा वळविला आहे. पाणीपट्टी थकविणाऱ्या अडीचशेपेक्षा जास्त मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित करण्यात आले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक असे तीन लाख ११ हजार ३९१ अधिकृत नळजोडधारक आहेत. महापालिकेला पाणीपुरवठा विभागाकडून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. थकबाकीही वाढत



होती. मालमत्ताकरातून दिवसेंदिवस उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टी मात्र थकीत राहत असल्याने उत्पन्नावर परिणाम होत होता. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पाणीपट्टी वसुली ही करआकारणी व करसंकलन विभागामार्फत करण्याचा निर्णय घेतला. मालमत्ताकर आणि पाणीपट्टी एकत्र वसूल करण्याचा निर्णय यशस्वी होताना दिसत आहे. आतापर्यंत पहिल्यांदाच ६३ कोटी रुपयांची पाणीपट्टी वसूल झाली आहे. तसेच उर्वरित २७ दिवसांत विक्रमी पाणीपट्टी वसूल करण्याचा मानस असल्याचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपट्टी थकलेल्या आणि क्षमता असूनही ती न भरणाऱ्या अडीचशेपेक्षा जास्त मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित केले आहेत. मीटर निरीक्षक आणि करसंकलन विभागाच्या पथकाकडून नळजोड खंडित करण्याची कारवाई केली जात आहे. यामुळे नागरिक पाणीपट्टी भरण्यास प्राधान्य देताना दिसत आहेत. दि. ३१ मार्चपर्यंत थकबाकीदारांचे नळजोड खंडित करण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. ७५ कोटींची पाणीपट्टी वसूल करण्यावर विभागाचा भर आहे. आगामी आर्थिक वर्षापासून पाणीपुरवठा विभागाच्या सहकार्याने करसंकलन विभागाच्या वतीने बोगस नळजोड शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील म्हणाले की, मालमत्ताकर आणि पाणीपट्टी एकत्रित वसूल करण्यामुळे पाणीपट्टीवसुलीचा आलेख वाढत आहे. आगामी आर्थिक वर्षात मालमत्ताकर आणि पाणीपट्टीची देयके एकत्रित दिली जाणार आहेत.महापालिकेला पाणीपुरवठा विभागाकडून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. थकबाकीही वाढत होती. मालमत्ताकरातून दिवसेंदिवस उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टी मात्र थकीत राहत असल्याने उत्पन्नावर परिणाम होत होता. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पाणीपट्टी वसुली ही करआकारणी व करसंकलन विभागामार्फत करण्याचा निर्णय घेतला. मालमत्ताकर आणि पाणीपट्टी एकत्र वसूल करण्याचा निर्णय यशस्वी होताना दिसत आहे. आतापर्यंत पहिल्यांदाच ६३ कोटी रुपयांची पाणीपट्टी वसूल झाली आहे. तसेच उर्वरित २७ दिवसांत विक्रमी पाणीपट्टी वसूल करण्याचा मानस असल्याचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपट्टी थकलेल्या आणि क्षमता असूनही ती न भरणाऱ्या अडीचशेपेक्षा जास्त मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित केले आहेत.

# वायसीएम रुग्णालयात निवासी डॉक्टरांचा संप सुरू!

## डॉक्टर संपावर गेल्याने रुग्णव्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात काल रात्री एका निवासी डॉक्टरला झाली होती. या घटनेचा निषेध करत निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. रुग्णालयातील १४८ निवासी डॉक्टर संपावर गेल्याने रुग्णव्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली आहे. अत्यावश्यक सेवा विभागातील निवासी डॉक्टरही या संपात सहभागी असल्याने यंत्रणांवर मोठा ताण पडत आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण




रुग्णालयात काल रात्री एका निवासी डॉक्टरला रुग्णाच्या नातेवायकांनी मारहाण केली होती. या घटनेच्या निषेधार्थ हा संप पुकारण्यात आला आहे. महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून या प्रकरणात मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.या घटनेचा निषेध करत निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. रुग्णालयातील १४८ निवासी डॉक्टर संपावर गेल्याने रुग्णव्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली आहे. अत्यावश्यक सेवा विभागातील निवासी डॉक्टरही या संपात सहभागी असल्याने यंत्रणांवर मोठा ताण पडत आहे.

# डॉ. कोल्हेंना उमेदवारी देण्यात चूक

## दोन वर्षातच अमोल कोल्हे कंटाळले : अजित पवार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पहिल्या दोन वर्षातच खासदार अमोल कोल्हे कंटाळले होते. राजीनामा देण्याचे ते बोलत होते. यात चूक आमचीच आहे. विकासकामे करण्याची आवड आहे की नाही, हे पहायला हवे होते. कोल्हे यांना उमेदवारी देऊन, त्यांचा प्रचार करून आमचीही चूक झाली आहे, असे राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे सांगितले.अजित पवार यांनी सोमवारी शिरूरमध्ये शेतकरी मेळावा घेतला. या मेळाव्याच्या माध्यमातून त्यांनी कोल्हे यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, वक्तृत्व चांगले आहे. दिसायलाही रुबाबदार आहे. पुढे काही तरी चांगले काम करतील, असे वाटल्यानेच अन्य पक्षाचे असतानाही त्यांना





उमेदवारी दिली. मात्र ते दोन वर्षातच कंटाळले. निवडून आल्यानंतर दोन वर्षांतच कोल्हे यांनी राजीनामा देण्याची भाषा सुरू केली. जनतेने पाच वर्षांसाठी निवडून दिले आहे. त्यामुळे दोन वर्षांत राजीनामा देणे योग्य नाही, असे मी त्यांना सांगितले. मात्र कलावंत असल्याने त्याचा व्यावसायावर परिणाम होत आहे. सेलिब्रेटी असल्याने रोज मतदारसंघात येणे शक्य नाही, असे कोल्हे यांनी सांगितले. कोल्हे यांना तुम्हीच पक्षात घेतले आहे, तुम्हीच त्यांची समजूत काढा, असे पक्षाचे नेते मला सांगत होते.कोणाच्या डोक्यात काय आहे, हेच कळायला मार्ग नव्हता. राजकारण हा त्यांचा पिंड नाही. एखाद्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी हेमा मालिनी, धर्मेंद्र, गोविंदा, सनी देओल निवडणुकीला उभे रहातात. लोक त्यांच्याकडे पाहून मतदान करताना. मात्र त्यांचा राजकारणाशी काय संबंध नाही. विकासकामे करण्याची आवड आहे की नाही, हे पहायला हवे होते. ती चूक झाली, असे पवार यांनी सांगितले. शरद पवार यांनी मला निवडणुकीची संधी दिली. कलावंताला उमेदवारी देणे ही चूक होती, असे पवार म्हणत आहेत. त्यांनी काही कलावंतांचीही उदाहरणे दिली. मात्र त्यांनी दिलेल्या एकाही खासदाराला संसदरत्न पुरस्कार मिळाला नाही. शिरूर लोकसभा मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न मांडताना मला तीन वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे. खासगीत झालेल्या गोष्टी जाहीर नकरण्याचा राजकारणातील अलिखीत नियम आहे. तो मी नेहमीच पाळतो. मात्र सातत्याने आरोप करत असाल तर आणि माझ्यासारख्या कलावंताला उमेदवारी देणे चूक असेल तर दहा-दहा वेळा माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला तुमच्या पक्षात येण्यासाठी निरोप का पाठविण्यात आले. लपून-छपून भेटीगाठी करण्याचे कोणते कारण होते, असा सवाल खासदार कोल्हे यांनी केला.यांचा विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पराभव केला होता. शिवसेनेतील फुटीनंतर आढळराव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला. त्यामुळे आढळराव पाटील आणि कोल्हे यांच्या लढत होईल, अशी चर्चा असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर राजकीय समीकरणे बदलली. अजित पवार यांनीही शिरूर लोकसभेची जागा निवडून आणण्याचा चंग बांधल्याने त्यांचा उमेदवार कोण असेल, अशी चर्चा सुरू झाली असतानाच आढळराव यांना म्हाडाचे अध्यक्षपद देण्यात आले. अजित पवार यांनी सोमवारी शिरूरमध्ये शेतकरी मेळावा घेतला. या मेळाव्याच्या माध्यमातून त्यांनी कोल्हे यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, वक्तृत्व चांगले आहे. दिसायलाही रुबाबदार आहे. पुढे काही तरी चांगले काम करतील, असे वाटल्यानेच अन्य पक्षाचे असतानाही त्यांना उमेदवारी दिली. मात्र ते दोन वर्षातच कंटाळले. निवडून आल्यानंतर दोन वर्षांतच कोल्हे यांनी राजीनामा देण्याची भाषा सुरू केली.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे आता सुलभपणे उपलब्ध

## ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना घरबसल्या कागदपत्रे मिळणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये, संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक कागदपत्रे आता सुलभपणे उपलब्ध होणार आहेत. विद्यापीठ आता कागदविरहित प्रक्रियेकडे जात असून, ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना घरबसल्या कागदपत्रे मिळणार आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राकडून (स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर) विद्यार्थ्यांना शैक्षणिक




कागदपत्रे दिली जातात. त्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून, त्याची मुद्रित प्रत आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठात सादर करावी लागते. या प्रक्रियेत बराच वेळ जात असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होते. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया केवळ ऑनलाइन पद्धतीने राबवण्याची मागणी विद्यार्थी संघटनांकडून करण्यात येत होती. तसेच अधिसभा सदस्यांनीही त्याबाबतची मागणी केली होती. त्यानंतर विद्यापीठाने नेमलेल्या परीक्षासुधार समितीच्या माध्यमातून आता ही प्रक्रिया पूर्ण ऑनलाइन आणि कागदविरहित करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांना ट्रान्स्क्रिप्टसाठी ऑनलाइन सुविधा देण्यात येणार आहे, तर पुढील टप्प्यात पदवी प्रमाणपत्र, परदेशातील विद्यापीठांत प्रवेशासाठी आवश्यक गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, उत्तीर्णता प्रमाणपत्र अशी कागदपत्रे दिली जाणार आहेत. विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर परीक्षा विभागाकडून त्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण केली जाईल. त्यानंतर ती कागदपत्रे विद्यार्थ्यांच्या ‘स्टुडंट प्रोफाइल’मध्ये उपलब्ध होतील. त्यानंतर ती कागदपत्रे विद्यार्थ्यांना डाउनलोड करून घेता येतील.परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, की विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन कागदपत्रे, प्रमाणपत्रांची प्रक्रिया कागदविरहित करण्याची कल्पना आहे. त्यासाठीचा प्रस्ताव परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत मांडून मान्यता घेतली जाईल. विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यानंतर त्यांना त्याच्या अर्जाची प्रगती तपासण्याची सुविधाही देण्याचे काम सुरू आहे. ऑनलाइन पद्धतीने कागदपत्रे देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे.

# रेल्वेचा भोंगळ कारभार प्रवाशांच्या उठला जीवावर!

## ड्युटी संपली चालक घरी, मालगाडी फलाटावर तर प्रवाशी वाऱ्यावर



**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी|** रेल्वेच्या पुणे विभागाच्या भोंगळ कारभारामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून फलाटावर यावे लागले. यवत रेल्वे स्टेशनवर दोन्ही फलाटावर मालगाड्या असल्याने पुणे बारामती डेमू गाडी मेन लाईनला घ्यावी लागली. यामुळे वृद्ध, महिला, लहान मुले यांनी मालगाड्यांच्या कफलिंगवरून फलाटावर यावे लागले. ही घटना आज रात्री पावणे आठ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत दोषी असणा-यांवर कडक कारवाई करण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.

आज सोमवार असल्याने पुणे - बारामती डेमू रेल्वेला मोठी गर्दी होती. ही गाडी पुणे रेल्वेस्थानकावरून पावणेसात वाजता सुटली. यवत येथे दोन फलाट आहेत. या दोन्ही फलाटावर मालगाड्या होत्या. यवत येथे दादर आहे. मात्र दादरपर्यंत प्रवाशांना मालगाडीमुळे पोहचता आले नाही. मालगाड्या लांबलचक असल्याने अनेकांनी कफलिंगवर चढून फलाटावर जाण्याचा धोका पत्करला.काही प्रवाशी अंधारात पुर्ण मालगाडीला वळसा घालून स्टेशनवर आले. यात महिला, मुले, वृद्ध प्रवाशांचे मोठे हाल झाले. प्रवाशांच्या सुदैवाने या दरम्यान कोणतीही मालगाडी चालू झाली नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. याबाबत प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. याबाबत रेल्वेच्या क्षेत्रीय सल्लागार समितीचे सदस्य विकास देशपांडे म्हणाले, 'रेल्वे प्रशासन प्रवाशांच्या जीवाशी खेळत आहे. रेल्वे कर्मचा-यांनी अत्यंत बेजबाबदार वर्तन केले आहे. दौंड बारामती दरम्यान पॅसेंजर गाड्या कमी असल्याने अशा गाड्यांना नेहमी गर्दी असते. रेल्वेने चौकशी करून यातील दोषींवर कडक कारवाई करावी.'देशपांडे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे याबाबत तक्रार केली आहे. विभागीय रेल्वे प्रबंधक यांनी बाबत दिलगीरी व्यक्त केली असून असा प्रकार पुन्हा होणार नाही. संबंधित दोषींवर कारवाई केली जाईल. असे देशपांडे यांना तक्रारीच्या लेखी उत्तरात कळविले आहे.

'पुणे - बारामती डेमू रेल्वेने आम्ही अनेकजण यवत-पुणे रोज प्रवास करतो. आज पुण्याहून यवत येथे आलेली आमची गाडी फलाटावर न थांबवता मुख्य मार्गिकेवरच थांबवली. त्यामुळे पायऱ्या नसलेल्या डेमूच्या बोगीतून उतरणे आणि दोन्ही बाजूंच्या फलाटालगत असलेल्य मालगाड्या ओलांडून फलाटावर जाण्यासाठी प्रवाशांना खुपच कसरत करावी लागली. आम्ही २०-२५ पासधारकांनी लेखी तक्रार यवतच्या स्टेशन मास्तरांकडे केली. तेव्हा मालगाडीचा चालक ड्युटी टाइम संपला असे म्हणून गाडी सोडून गेला' असे त्यांनी सांगितले.आज

सोमवार असल्याने पुणे - बारामती डेमू रेल्वेला मोठी गर्दी होती. ही गाडी पुणे रेल्वेस्थानकावरून पावणेसात वाजता सुटली. यवत येथे दोन फलाट आहेत. या दोन्ही फलाटावर मालगाड्या होत्या. यवत येथे दादर आहे. मात्र दादरपर्यंत प्रवाशांना मालगाडीमुळे पोहचता आले नाही. मालगाड्या लांबलचक असल्याने अनेकांनी कफलिंगवर चढून फलाटावर जाण्याचा धोका पत्करला.काही प्रवाशी अंधारात पुर्ण मालगाडीला वळसा घालून स्टेशनवर आले. यात महिला, मुले, वृद्ध प्रवाशांचे मोठे हाल झाले. प्रवाशांच्या सुदैवाने या दरम्यान कोणतीही मालगाडी चालू झाली नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. याबाबत प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. याबाबत रेल्वेच्या क्षेत्रीय सल्लागार समितीचे सदस्य विकास देशपांडे म्हणाले, 'रेल्वे प्रशासन प्रवाशांच्या जीवाशी खेळत आहे.

# कात्रज : पसार बिबट्या आढळला १२ तासानंतर

## कात्रज प्राणी संग्रहालयातील प्रकार; संग्रहालय प्रशासनाचा गलथान कारभार उघड

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी|** राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील विलगीकरण कक्षात ठेवण्यात आलेला बिबट्या पिंजऱ्यातून पसार झाला होता. तो १२ तासानंतर आढळून आल्याचे सांगण्यात येत आहे. १३० एकरांवर वसलेल्या प्राणी संग्रहालयात तीन मादी आणि एक नर जातीचा बिबट्या आहे. त्यामधील नर जातीचा बिबट्या पसार झाला होता. सर्पोद्यानातील विलगीकरण केंद्राजवळील पाण्याच्या टाकीजवळ रात्री साडेआठच्या सुमारास बिबट्या दिसला. तो झाडीत असल्यामुळे त्याला डार्ट मारून बेशुद्ध करता येत नाही. त्यामुळे त्याला पकडण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याच्या आजूबाजूला तीन पिंजरे लावण्यात आले आहेत. सीमा भिंत ओलांडून तो बाहेर जाणार नाही. काही वेळात त्याला त्याच्या पिंजऱ्यात परत नेण्यात यश मिळेल, असा विश्वास भारतीय सर्प विज्ञान संस्थेचे विश्वस्त श्रीराम शिंदे यांनी 'सकाळशी' बोलताना व्यक्त केला.हा बिबट्या




कर्नाटकमधील हंपी येथून आणण्यात आला होता. प्राण्यांच्या अनाथालयात काही दिवसांपासून त्याला विलगीकरणात ठेवण्यात आले होते. मात्र, सोमवारी सकाळी साधारणतः साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पिंजऱ्यामध्ये बिबट्या नसल्याचे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. पिंजऱ्याच्या वरच्या बाजूची सळई उचकटून तो प्रसार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे प्राणी संग्रहालयाचे संचालक राजकुमार जाधव यांनी सांगितले. बिबट्या पसार झाल्याचे लक्षात आल्यानंतर तो पसार झालेला भाग पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला. मात्र, पूर्ण प्राणी संग्रहालय बंद करण्यात आले नव्हते. बिबट्याला शोधण्यासाठी अग्निशमन दलासह विविध पथके तैनात करण्यात आली होती. प्राणी संग्रहालयात वेगवेगळ्या प्रकारचे शंभरहून अधिक प्राणी असून प्राणीसंग्रहालयाच्या शेजारी दाट लोकवस्ती आहे. रविवारी रात्री प्राणी संग्रहालयात प्राण्यांच्या अदलाबदली कार्यक्रमांतर्गत चार प्राणी ट्रकमधून आणण्यात आले.